ePaper
“काका-पुतण्यांचे विलीनीकरण म्हणजे भाजपकडे पहिलं पाऊल!

| वर्ष - 9 | अंक -126 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 30 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- CSK च्या गोलंदाजाने फोडली डरकाळी!
- मोहसीन नक्वींनी लाज सोडली!
- कौंडिण्य' मस्कतला रवाना
- भाजपामध्ये फुटीची चिन्हे?

### सुप्रिया सुळे केंद्रीय मंत्रिमंडळात जाण्याची शक्यता व्यक्त | प्रकाश आंबेडकरांचा खळबळजनक दावा

# ‘शरद पवार भाजपसोबत जाणार’!

## पिंपरी-चिंचवडमधील वक्तव्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ



| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील एका राजकीय वक्तव्यानंतर राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना आणि तर्कवितर्कांना उधाण आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे भविष्यात भाजपसोबत सत्तेत सहभागी होतील, असा खळबळजनक दावा करत महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. सध्याची घडामोडी पाहता शरद पवार यांच्यासाठी भाजपकडे जाण्याची ‘पायवाट’ तयार केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला**

पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, “शरद पवार भाजपसोबत जाणार नाहीत, असे गृहित धरून चालणाऱ्या सेक्युलर मतदारांनी सावध राहावे. येत्या काळात सुप्रिया सुळे यांना जर केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळाले, तर त्यात कोणालाही आश्चर्य वाटू नये.” त्यांच्या या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये अस्वस्थता वाढली असून, राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी थेट आरोप करत सांगितले की, “शरद पवार आणि अजित पवार यांचे विलिनीकरण, अजित पवार यांचे भाजपसोबत असणे आणि त्यातून सुप्रिया सुळे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळणे, हे चित्र दूरचे नाही.” महाविकास आघाडी सोडून शरद पवार सत्तेत सहभागी होतील का, या थेट प्रश्नावर त्यांनी होकारार्थी उत्तर दिले. त्यांच्या या विधानामुळे पवार कुटुंबाच्या राजकीय भवितव्याबाबत नव्या चर्चांना उधाण आले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी स्थानिक राजकारणावरही परखड भूमिका मांडली. “पिंपरी-चिंचवडची निवडणूक ही पक्ष विरुद्ध पक्ष अशी नसून ‘गाववाले विरुद्ध बाहेरचे’ अशी आहे,” असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. १९७२ च्या दुष्काळानंतर राज्याच्या विविध भागांतून पिंपरी-चिंचवडमध्ये स्थलांतर झाले. अनेक कुटुंबे येथे स्थायिक झाली, उद्योग, कामधंदे उभे राहिले; मात्र तरीही आजही या नागरिकांना ‘गाववाले’ म्हणून पाहिले जात नाही, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे आगामी निवडणूक स्थानिक विरुद्ध बाहेरचे अशीच होईल, असा दावा त्यांनी केला.

या वक्तव्याद्वारे त्यांनी अप्रत्यक्षपणे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला. “अजित पवार हे बारामतीचे आहेत, पिंपरी-चिंचवडचे नाहीत, हे विसरता कामा नये,” असे सूचक विधान करत त्यांनी स्थानिक नेतृत्वाचा मुद्दा पुढे केला. पिंपरी-चिंचवडमधील राजकारणात बाहेरून येणाऱ्या नेतृत्वावर जनतेचा रोष वाढत असल्याचे संकेतही त्यांनी दिले.

सेक्युलर मतदारांना इशारा देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, “भाजपसोबत जाण्यासाठी सध्या शरद पवार यांच्यासाठी हळूहळू वातावरण तयार केले जात आहे. अजित पवार आधीच भाजपसोबत आहेत. आता पुढचा टप्पा म्हणजे दोन्ही पवार गटांचे एकत्रीकरण आणि त्यानंतर सत्तेत सहभाग.” हा संपूर्ण राजकीय प्रवास आधीच ठरवलेला असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवरही जोरदार टीका केली. “काँग्रेसमधील अनेक स्थानिक नेते केवळ नावापुरते काँग्रेसमध्ये आहेत, मात्र त्यांची आत्मा भाजपमध्ये आहे,” असा गंभीर आरोप त्यांनी केला. काँग्रेसमधील अंतर्गत विस्कळीतपणा आणि नेतृत्वाचा अभाव यामुळे भाजपला फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीच्या भूमिकेबाबत स्पष्टीकरण देताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, “वंचित बहुजन आघाडीने सुरुवातीपासूनच भाजपसोबत न जाण्याची स्पष्ट भूमिका घेतली होती. आम्ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासोबत जाण्याची तयारी दर्शवली होती.” मात्र, महाविकास आघाडीतील नेत्यांनी ‘नारद मुनीची भूमिका’ घेतली आणि एकत्र येण्याऐवजी विघटन घडवून आणले, असा आरोप त्यांनी केला.

त्यांच्या मते, सेक्युलर मतांचे एकत्रीकरण न झाल्यामुळेच भाजपला सातत्याने राजकीय फायदा होत आहे. “एकीकडे भाजपविरोधात बोलायचे आणि दुसरीकडे त्यांच्याशी जुळवून घ्यायचे, ही दुटप्पी भूमिका आता जनतेच्या लक्षात येत आहे,” असे ते म्हणाले. त्यामुळे येत्या निवडणुकांमध्ये मतदार अधिक जागरूक भूमिका घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रकाश आंबेडकरांच्या या वक्तव्यानंतर राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून, शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे आणि महाविकास आघाडीच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक, मुंबई महानगरपालिका निवडणूक आणि आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

एकूणच, प्रकाश आंबेडकरांच्या दाव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून, पवार कुटुंबाची पुढील राजकीय वाटचाल नेमकी कोणत्या दिशेने जाणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## “काका-पुतण्यांचे विलीनीकरण म्हणजे भाजपकडे पहिलं पाऊल!

“काका आणि पुतणे एकत्र आले आहेत, याचा अर्थ दोन्ही राष्ट्रवादींचे प्रत्यक्षात विलीनीकरण झाले आहे,” असे म्हणत त्यांनी अजित पवारांच्या गटासोबत हातमिळवणी करणे म्हणजे शरद पवारांनी भारतीय जनता पक्षाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असल्याचा दावा केला. आंबेडकर म्हणाले की, शरद पवार जे जाहीरपणे बोलतात, त्याच्या नेमकी उलट कृती करत असल्याचा अनुभव वारंवार आला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची पुढील राजकीय वाटचाल भाजपकडे झुकणारी असू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्या भविष्यातील भूमिकेवरही सूचक टिप्पणी केली. “जर येत्या काळात सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री झाल्या, तर धर्मनिरपेक्ष मतदारांनी त्यावर आश्चर्य वाटून घेऊ नये,” असे ते म्हणाले. दरम्यान, राज्यात पवारांच्या युतीवर चर्चा सुरू असतानाच मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने अधिकृत युती जाहीर केली आहे. मुंबईतील २२७ जागांपैकी वंचित ६२ जागांवर निवडणूक लढवणार असून उर्वरित जागांवर काँग्रेस उमेदवार देणार आहे. या घडामोडींमुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

जिल्हा क्रीडामहोत्सव

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे काम कौतुकास्पद

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे काम कौतुकास्पद'; डॉ. पंडित विद्यासागर

## शिक्षण विश्व : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या क्रीडा महोत्सवाचे उदघाटन

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पुणे जिल्हा शिक्षण मंडळ उच्च प्रतिचे शिक्षण देण्यासाठी मूलभूत सुविधांबरोबरच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न करत आहे. खेळात यश अपयशापेक्षा व्यक्तिमत्त्व विकास हा महत्त्वाचा भाग असतो. नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ हा महत्त्वाचा घटक असून खेळाला प्रोत्साहन देण्याचे काम ही संस्था अशा क्रीडा स्पर्धांतून करत आहे. ही बाब अभिनंदनास्पद आहे. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले.**




पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्यावतीने आयोजित जिल्हा क्रीडामहोत्सवाचे आयोजन वाघीरे महाविद्यालय सासवड येथे करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या क्रीडामहोत्सवाचे उदघाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सहायक क्रीडा संचालक प्रा. सुदाम शेळके, सासवडी नगर परिषदेचे नगराध्यक्ष आनंदीकाकी जगताप, जेजुरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, पोलीस उपनिरीक्षक जोत्सना भालेराव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे उपस्थित होते. या प्रसंगी बंडूकाका जगताप, बाळासाहेब भिंताडे, बाळासाहेब कामथे, आझमभाई पानसरे, नवनाथ बोरावके,संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव ए. एम. जाधव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. संगीता जगताप, प्राचार्य डॉ. पंडीत शेळके, प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण त्याचप्रमाणे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ सामूहिक प्रयत्नातून नेत्रदीपक अशा क्रीडा महोत्सवाचे आयोजन करते. यातून निच्छितच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील असा विश्वास आहे. असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले. पोलीस उपनिरीक्षक जोत्सना भालेराव यांनी संस्थेने क्रीडा स्पर्धांसाठी दिलेलेल्या प्रोत्साहनामुळे मी माझे करिअर घडवू शकले असे सांगितले. मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी प्रास्ताविकात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खेळात प्रोत्साहन मिळावे या हेतूने संस्थेच्यावतीने दरवर्षी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जात असून या स्पर्धेतून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होत आहेत. या स्पर्धेत ४००० खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धांचे फलित म्हणजे संस्थेच्या विविध शाखांतील खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवत आहेत. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूण ७१ सुवर्ण, ५२ रौप्य आणि २८ कास्य पदके प्राप्त केली असल्याचे सांगितले.

कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. छात्रसेना, स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी शानदार संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली. विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी योगासने, मलखांब प्रात्यक्षिके, ढोल पथक, तसेच बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय खेळाडू गणेश तोटे व मिस्टर यूनिवर्स संकेत काळे यांनी खेळाडूंना शपथ दिली.

### 'काही प्रॉब्लेम ये का?'

यावेळी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या 'काही प्रॉब्लेम ये का?' एकांकिकेने बाजी मारत महाराष्ट्रीय कलोपासक पुणे आयोजित हिरकमहोत्सवी पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत महाअंतिम फेरीमध्ये राज्यात तिसरा क्रमांक पटकावल्याबद्दल प्राचार्य व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड, डॉ. किरण गाढवे यांनी केले. तर आभार प्राचार्य डॉ.पंडीत शेळके यांनी मानले. संस्थेतील सर्व शाखाप्रमुख आणि क्रीडाशिक्षक यांनी या क्रीडा महोत्सवाचे संयोजन केले आहे.

# प्रदूषणाबाबत राजकारणीच सजग नाहीत !

## परिसर संस्थेच्या वरिष्ठ कार्यक्रम सहयोगी श्वेता वेर्णेकर यांचे खडे बोल

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस बिकट बनली आहे. चांगल्या हवेचे दिवस कमी होऊन खराब हवेचे दिवस वाढू लागले आहेत. राज्यकर्ते आणि प्रशासन याबाबत ठोस पावले उचलताना दिसत नाहीत. त्यांच्यात या प्रश्नाबाबत सजगताच दिसत नाही, असे खडे बोल परिसर संस्थेच्या वरिष्ठ कार्यक्रम सहयोगी श्वेता वेर्णेकर यांनी सोमवारी सुनावले.**




पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील नागरी समस्यांचा वेध घेण्यासाठी आयोजित 'लोकसत्ता लोकसंवाद' कार्यक्रमात श्वेता वेर्णेकर यांनी शहरातील वाढते प्रदूषण आणि त्यावरील उपाययोजनांवर भाष्य केले. पुण्यात गेल्या काही वर्षांत प्रदूषणात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ आणि त्यावरील महापालिकेच्या तकलादू उपाययोजनांचा लेखाजोखा त्यांनी मांडला. याचवेळी राजकारण्यांकडून या विषयाला स्पर्श न करण्यामागील कारणेही त्यांनी उलगडली.त्या म्हणाल्या की, 'स्वच्छ हवा ही प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रदूषणाची समस्या वाढत असल्याने त्यांना स्वच्छ हवा मिळत नाही.

हा प्रत्येकाच्या जगण्याशी थेट निगडित असलेला विषय आहे. प्रदूषणाचा थेट आणि तत्काळ परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे या विषयाबाबत नागरिकांमध्येही फारशी जागरूकता नाही.

दुसऱ्या बाजूला राजकारण्यांकडून दृश्य स्वरूपाच्या विकासकामांना प्राधान्य दिले जाते. त्यांना ही विकासकामे लोकांपर्यंत पोहोचविणे सोपे जाते. यामुळे पुणेकरांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या विषयाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. नागरिकांनीच पुढे येऊन आता स्वच्छ हवेचा मुद्दा उचलायला हवा.'

### मोठ्या प्रकल्पांना प्राधान्य

हवा प्रदूषण हा विषय किचकट समजला जातो. याचबरोबर तो लोकानुनयी विषय नाही. पाणी, रस्ते, उड्डाणपुलासह मोठ्या प्रकल्पांना राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात स्थान दिले जाते. लोकांना आकर्षक वाटतील आणि पसंतीस उतरतील, असे विषय राजकीय पक्षांकडून उचलले जातात. त्यामुळे प्रदूषणाकडे आणि पर्यायाने त्यावरील उपाययोजनांकडेही दुर्लक्ष केले जाते, असे वेर्णेकर यांनी नमूद केले. पुण्यातील प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस बिकट बनली आहे. चांगल्या हवेचे दिवस कमी होऊन खराब हवेचे दिवस वाढू लागले आहेत.

**पिंपरी-चिंचवडमध्ये काय?** भाजपा महायुती, महाविकास आघाडीत जोरदार राजकीय हालचाली

# CM फडणवीसांकडून घराणेशाहीला "ब्रेक"

## मिशन- PCMC : आमदार लांडगे यांचे बंधू, आमदार खापरे यांच्या मुलाचा पत्ता कट?

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. भाजपा महायुती आणि महाविकास आघाडीत जोरदार राजकीय हालचाली सुरू आहेत. त्यातच "आमदार-खासदारांच्या मुलांना उमेदवारी नाही.." अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. त्याचे स्वागत महाराष्ट्रभरात होते आहे.( घराणेशाही ) राज्यातील राजकारणामध्ये राजकीय घराण्यांचा प्रचंड पगडा आहे. मुलगा, सून, नातू, पणतू असा राजकीय वारसा चालवला जातो. मात्र, यावेळी भाजपात घराणेशाही चालणार नाही, असे स्पष्ट संकेत आहेत.**

पुणे महानगरपालिकेसाठी भाजपाने आमदार, खासदार यांच्या मुलांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी न देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लोकप्रतिनिधींमध्ये नाराजी तर कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या अगोदर भाजपने गुजरात आणि दिल्ली या ठिकाणी अशाच प्रकारे घराणेशाहीला डावललं होतं. या निर्णयाला पार्श्वभूमी आहे ती म्हणजे नुकत्याच झालेल्या नगरपरिषद




निवडणुकीमध्ये राजकीय नेत्यांच्या घरामध्ये उमेदवारी देणे भाजपला महागात पडले होते. त्यात अनेकांचा पराभव झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे भाजपने घराणेशाहीला नाकारण्यचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे आमदार महेश लांडगे यांचे बंधू कामगार नेते सचिन लांडगे प्रभाग क्रमांक 5 मधून निवडणुकीच्या रिंगणात उतरतील, असे चित्र होते. तसेच, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांचा मुलगा जयदीप खापरे प्रभाग क्रमांक 19 मधून निवडणुकीची तयारी करीत आहेत. त्यामुळे लांडगे आणि खापरे यांना CM फडणवीस यांचा नियम लागू होणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# एबी फॉर्म थेट निवडणूक अधिकाऱ्यांच्या हातात देणार?

## इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे सर्वच पक्षांकडून सावध पवित्रा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडी, महायुतीचे अद्याप चित्र स्पष्ट होत नसल्याने उमेदवारी यादी जाहीर झाली नाही. असे असतानाच, ३२ प्रभागांपैकी विविध प्रभागांत उमेदवारांनी स्वतःच पॅनल तयार करून प्रचाराचा नारळ फोडला आहे. मात्र, पक्षाने ऐनवेळी तिकीट नाकारल्यास उमेदवारांची कोंडी होण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे सर्वच पक्षांनी सावध पवित्र घेतला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांच्या हातात थेट एबी फॉर्म देऊन निवडणुकीचे सोपस्कार पार पाडले जाणार आहेत.**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख मंगळवार (दि. ३०) असून आता केवळ एकच दिवस शिल्लक राहिला आहे. तरीही भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), शिवसेना,




### यादी जाहीर नसताना पॅनल तयार करून उमेदवारांचा प्रचार

काँग्रेस यांसारख्या प्रमुख पक्षांनी अधिकृत उमेदवार यादी जाहीर केलेली नाही. त्यामुळे इच्छुकांमध्ये प्रचंड धाकधूक निर्माण झाली आहे. अनेक इच्छुक उमेदवारांनी तयारी पूर्ण केली असून अर्ज भरण्यासाठी शुभ दिवस आणि मुहूर्तही काढले आहेत. मात्र, पक्षाकडून अधिकृत उमेदवारी म्हणजेच एबी फॉर्म मिळेल की नाही, या प्रश्नाने सगळेच इच्छुक अस्वस्थ झाले आहेत.

दरम्यान, शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पक्षांतर सुरू आहे. शहर भाजपकडून इतर पक्षांतील ताकदवान पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि इच्छुकांना पक्षात घेण्याचा सपाटा लावण्यात आला आहे. शेवटच्या दोन दिवसांतही मोठ्या प्रमाणावर फोडाफोडी होणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यामुळे दररोज राजकीय समीकरणे बदलत असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या एकूण १२८ जागांसाठी शहरभरातून तब्बल दोन हजारांहून अधिक इच्छुकांनी उमेदवारी अर्ज नेल्याची माहिती आहे. इतक्या मोठ्या संख्येने इच्छुक असल्याने सर्वच पक्षांनी अत्यंत सावध पवित्रा घेतल्याचे दिसून येत आहे. अधिकृत यादी जाहीर न करता, शेवटच्या क्षणी थेट एबी फॉर्म निवडणूक अधिकाऱ्यांच्या हातात देऊन निवडणुकीचे सोपस्कार पार पाडले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, काही इच्छुकांनी आपल्या नेत्यांनी दिलेल्या शब्दांवर विश्वास ठेवून पक्षाचे थेट पॅनल जाहीर केले आहे. एवढेच नव्हे, तर हे पॅनल सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल केले जात आहेत. या पॅनलमध्ये जुन्या आणि नव्या चेहऱ्यांचा मेळ साधल्याचे दिसून येत असून, त्यामुळे अनेक इच्छुकांच्या पोटात गोळा आला आहे. प्रत्यक्ष प्रचार सुरू होण्याआधीच शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## आयारामांमुळे भाजप नेत्यांची डोकेदुखी वाढली

शहर भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि इच्छुकांचे पक्षप्रवेश झाले आहेत. भाजपकडून निवडणूक लढवण्यासाठी तब्बल ७३० इच्छुकांनी मुलाखती दिल्या असतानाच, दुसऱ्या पक्षांतील पदाधिकाऱ्यांना पक्षात घेण्याचा वेगही वाढला आहे. या आयाराम-गयारामांमुळे तिकीट वाटप करताना भाजप नेत्यांची डोकेदुखी वाढणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

नव्या प्रवेश घेतलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांनी थेट पॅनल जाहीर करून प्रचार सुरू केल्यामुळे भाजपमधील निष्ठावंत, जुन्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. काही प्रभागांत तर नव्याने प्रवेश घेतलेल्या पदाधिकाऱ्यांना जाब विचारण्याचे प्रकारही घडू लागले आहेत. त्यामुळे येत्या २४ तासांत उमेदवार यादी, एबी फॉर्म आणि पक्षीय निर्णयांवर संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, महापालिका निवडणूक अधिकच चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत.



भूमिका

**विदर्भाच्या मागासलेपणाला केवळ एक व्यक्ती किंवा एक पक्ष जबाबदार नसून, ही दशकानुदशके चालत आलेली 'व्यवस्थात्मक उपेक्षा' आहे. जोपर्यंत महाराष्ट्राचे नियोजन करताना 'प्रादेशिक समतोल' हा केंद्रबिंदू मानला जात नाही, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. विदर्भाला आता केवळ आश्वासनांची किंवा आर्थिक पॅकेजची खिरात नको आहे, तर त्याला त्याच्या हक्काचे पाणी, वीज आणि हक्काचा रोजगार हवा आहे.**

# विदर्भाच्या मागासलेपणाचे उत्तरदायित्व




महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत आणि श्रीमंत राज्य मानले जाते. 'पुरोगामी महाराष्ट्र' आणि 'आर्थिक महासत्ता' अशा बिरुदावली मिरवताना राज्याच्या एका मोठ्या भूभागाकडे, म्हणजेच विदर्भाकडे पाहिले, तर विकासाचा हा दावा फोल वाटू लागतो. मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिज साठे, दाट जंगले आणि बारमाही वाहणाऱ्या नद्या लाभूनही विदर्भ आजही मागासलेपणाच्या गर्तेत अडकलेला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत महाराष्ट्राने अनेक टप्पे गाठले, पण विदर्भाचा 'विकास अनुशेष' मात्र कमी होण्याऐवजी वाढतच गेला. या विदारक स्थितीला नक्की जबाबदार कोण? हा प्रश्न आज विदर्भातील प्रत्येक सुजाण नागरिकाच्या मनात घर करून आहे. विदर्भाच्या मागासलेपणाच्या मुळाशी 'राजकीय सत्तेचे केंद्रीकरण' हे सर्वात मोठे कारण आहे. १ मे १९६० रोजी जेव्हा संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली, तेव्हा 'नागपूर करारा'द्वारे विदर्भाला विकासाचा समान वाटा आणि प्रशासकीय संरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, काळाच्या ओघात हे करार केवळ कागदावरच राहिले. महाराष्ट्राच्या सत्तेची सूत्रे दीर्घकाळ पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांच्या हाती राहिली. या नेत्यांनी सहकार चळवळ, साखर कारखाने आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून आपल्या विभागाचा कायापालट केला, मात्र विदर्भाकडे केवळ 'मतांची बँक' म्हणून पाहिले गेले. विदर्भाने महाराष्ट्राला मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक यांच्यापासून ते देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत अनेक मुख्यमंत्री दिले. मात्र, यापैकी बहुतेकांना राज्याच्या राजकारणात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रादेशिक हितसंबंधांशी तडजोड करावी लागली. विदर्भ हा मुळात शेतीप्रधान प्रदेश आहे, पण इथली शेती पूर्णपणे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. राज्याच्या एकूण जलसंपत्तीपैकी मोठा वाटा विदर्भातील नद्यांचा असतानाही, सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत या भागावर मोठा अन्याय झाला आहे. सिंचन घोटाळा आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे 'गोसीखुर्द'सारखा प्रकल्प ४० वर्षे उलटूनही पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रात सिंचनाचे प्रमाण जास्त असल्याने तिथे नगदी पिके घेतली जातात, तर विदर्भात सिंचनाअभावी शेतकरी आजही कोरडवाहू कापूस आणि सोयाबीनवर अवलंबून आहे. परिणामी, उत्पादन खर्च निघत नाही आणि शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला जातो. 'शेतकरी आत्महत्यांची राजधानी' ही ओळख विदर्भाच्या कपाळी पुसली न जाणे, हे राजकीय आणि प्रशासकीय अपयशाचे सर्वात मोठे लक्षण आहे.

ऊर्जा आणि उद्योगातील विरोधाभास विदर्भाच्या मागासलेपणाचा आणखी एक विरोधाभास म्हणजे ऊर्जा निर्मिती. संपूर्ण राज्याला प्रकाशमान करणारी वीज विदर्भातील चंद्रपूर, कोराडी आणि खापरखेडा येथील औष्णिक केंद्रात तयार होते. या प्रकल्पांमुळे होणारे प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास आणि विस्थापनाचे दुःख विदर्भातील जनता सोसते. मात्र, ही वीज ज्या उद्योगांना चालवण्यासाठी वापरली जाते, ते उद्योग पुणे, नाशिक किंवा मुंबईच्या पट्ट्यात उभारले जातात. विदर्भात मुबलक कोळसा, लोहखनिज आणि चुनखडी असूनही त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग येथे आले नाहीत. नागपूरचा 'मिहान' (MIHAN) प्रकल्प हा विदर्भाच्या विकासाचा 'गेम चेंजर' ठरेल असे स्वप्न दाखवण्यात आले होते, पण दोन दशकांनंतरही हा प्रकल्प रोजगार निर्मितीच्या बाबतीत चाचपडत आहे. प्रशासकीय अनास्था आणि निधीचा गैरवापर मोठ्या प्रमाणात केला जातो. केवळ नेतेच नाहीत, तर राज्याची नोकरशाही आणि प्रशासकीय व्यवस्थाही विदर्भाच्या मागासलेपणाला जबाबदार आहे. विदर्भासाठी मंजूर झालेला निधी अनेकदा तांत्रिक कारणास्तव खर्च केला जात नाही

## प्रासंगिक »

### जातीय कार्ड !

***उत्तर प्रदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी यांनी ब्राह्मण आमदारांच्या बैठकीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि अशा कृती पक्षाच्या तत्वांविरुद्ध असल्याचा इशारा दिला.***

नवीन वर्ष सुरू होण्यापूर्वीच उत्तर प्रदेशात राजकीय वातावरण तापले आहे. विधानसभेचे हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान २३ डिसेंबर रोजी संध्याकाळी लखनऊमध्ये एक बैठक झाली. त्यामुळे सत्तेच्या कॉरिडॉरमध्ये खळबळ उडाली आहे. कुशीनगरचे आमदार पी.एन. पाठक यांच्या निवासस्थानी सुमारे ५२ ब्राह्मण आमदार आणि विधान परिषदेचे सदस्य एमएलसी जेवणासाठी जमले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भाजप व्यतिरिक्त इतर पक्षांचे ब्राह्मण नेतेदेखील उपस्थित होते. बैठक होऊन आठ दिवस व्हायला आले आहेत; परंतु त्याचे कवित्व अजूनही सुरूच आहे. या बैठकीला उपस्थित असलेल्या एका नेत्याने आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यांच्यांशी चर्चा केली. आणखी एक वर्षानंतर उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका आहेत.

भारतीय रतीय राजकारणात नाती अनेकदा सत्तेपुढे लहान ठरतात. इतिहास साक्षी आहे की सिंहासन आणि सत्तेसाठीच्या संघर्षात रक्ताचे नातेही टिकत नाही, वडील-मुलगा, भाऊ-भाऊ आणि भाऊ-बहीण यांच्यातील संघर्ष नवीन नाही. मुघल इतिहासापासून आधुनिक राजकारणापर्यंत वाची असंख्य उदाहरणे आढळतात.

# नातेसंबंध आणि राजकारण



लोकशाहीत सतेची भाषा बदलली असली, तरी वारशाची भूक बदललेली नाही. त्यामुळेच राजकारणात अनेकदा राखीचा धागाही तुटतो. मात्र सध्याच्या काळात राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वधेरा हे या प्रवाहाला अपवाद ठरताना दिसतात.रतीय राजकारणात घराणेशाहीच्या चर्चेच्या केंद्रस्थानी बहुतांश वेळा गांधी कुटुंब असते. प्रत्यक्षात मात्र जवळपास प्रत्येक राजकीय पक्षात कुठल्या ना कुठल्या स्वरूपात घराणेशाही अस्तित्वात आहे. सध्याच्या राजकारणात दिल्लीच्या राजकारणात राहुल प्रियांका ही जोडी सातत्याने टीकेच्या भोवऱ्यात असते. देशातील अनेक राज्यांत भाऊ-बहिणीचे राजकारण तणाव आणि फाटाफुटीचे कारण ठरले आहे. तेलंगणापासून सुरुवात केली तर के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली तेलंगणा राष्ट्र समिती (नंतरची भारत राष्ट्र समिती) हे त्याचे मोठे उदाहरण आहे. येथे केसीआर यांचा मुलगा के. टी. रामाराव आणि मुलगी के, कविता यांच्यातील वाढता तणाव दीर्घकाळ चर्चेत राहिला. केसीआर मुख्यमंत्री असतानाच बहीण भावातील मतभेद उपड झाले. हळूहळू हा वाद राजकीय वारशाच्या उघड संघर्षात बदलला. के. कविता यांनी वडिलांना लिहिलेले पत्र लीक झाले, ज्यात पक्षाच्या कार्यक्रमात भाजपविरोधात केवळ दोन मिनिटेच का बोलले गेले, असा प्रश्न उपस्थित केला होता. हे पत्र समोर आल्यानंतर कविता यांनी थेट भावावर आरोप केले. भाऊ पक्षाला भाजपसोबत नेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. त्यानंतर कविता यांना राजकारणात सत्ता आणि वारसाहक्काच्या संघर्षात अनेक ठिकाणी भाऊ-बहिणींची नाती तुटलेली दिसतात. तेलंगणा, आंध्र, महाराष्ट्र, बिहार ते उत्तर प्रदेशपर्यंत अशी उदाहरणे आहेत. मात्र राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांचे नाते या प्रवाहाला अपवाद आहे. पक्षाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

पुढे त्यांनी स्वतः चा वेगळा पक्ष स्थापन केला. अशाप्रकारे राजकीय वारशाच्या संघर्षात भावाने बहिणीला बाजूला सारले. आंध्र प्रदेशची कहाणीही वेगळी नाही. वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा वाय. एस. जगनमोहन रेड्डी आणि मुलगी वाय. एस. शर्मिला यांनी एकत्र येत पक्षाला सत्तेपर्यंत नेले. संघर्ष सामायिक होता, मेहनतही संयुक्त होती. मात्र सत्ता मिळताच दुरावा वाढू लागला. मुख्यमंत्री झाल्यानंतर जगनमोहन यांनी बहिणीला राजकीयदृष्ट्या बाजूला काढले. त्यामुळे नाराजी वाढली. अखेर शर्मिलाने पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. निवडणुकीत जगनमोहन यांचा पराभव झाला आणि एन. चंद्राबाबू नायडू यांचे पुनरागमन झाले. येथेही सत्तेच्या संघर्षात भाऊ-बहिणीचे नाते तुटले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


## राज ठाकरेंवर टीका — पुंडलिक झालो होतो पण विठ्ठलानेच वीट फेकून मारली

# तर मग आम्ही विठ्ठल का बदलू नये!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माझा विठ्ठल बदलणार नाही असं प्रकाश महाजन म्हणाले होते. पण त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोडचिठ्ठी दिली. तसंच ते आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत आले आहेत. मी पुंडलिक झालो होतो पण विठ्ठलाने वीट फेकून मारली असं म्हणत त्यांनी राज ठाकरेंवर टीका केली आहे.**

### ठाकरेंबाबत काय म्हणाले महाजन?





छोट्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेवरच चर्चा असते. मोठ्या लोकांनी निष्ठा बदलली की समाज, विचार, समाजाची काळजी, देशाची काळजी असं ठरवलं जातं. गरीबाने खाल्लं तर शेण मोठ्यांनी खाल्लं तर श्रावणी. मी पुंडलिक झालो होतो. पण विठ्ठलाने मला वीट फेकून मारली तर मी काय करणार? पुंडलिकाला कुणीतरी विठ्ठल पाहिजे असतो. आपला भक्त पुंडलिक असावा याची विठ्ठलाने काळजी घेतली पाहिजे आणि विठ्ठलाने तसं वागलंही पाहिजे ती पुंडलिकांची एकट्याची जबाबदारी नाही." असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं आहे.मला राजकारणात काम करायचं आहे, हिंदुत्वासाठी काम करत होतो. तीन महिने मी वाट पाहिली. कुणीतरी समजावून सांगेल असं वाटलं होतं. मी पाच वर्षे त्याच पक्षात होतो ना? राजीनामा देऊनही तीन महिने वाट पाहिली. प्रकाश महाजन भावनेवर जगणारा माणूस आहे. विठ्ठलासाठी आम्ही काय केलं नाही? त्यांच्या नातवाची चाकरी करायचीही वाच्यता आम्ही जाहीरपणे केली होती. तेव्हाही लाजलो नाही. मग निष्ठा आम्हीच पाळायची का? मी निष्ठा बदलणार नाही म्हटलं होतं. पण विठ्ठलाने आम्हाला हमी दिली का? भक्ताला रुसायचं रागवायचा हक्क आहे की नाही? की विठ्ठलानेच मारक्या म्हशीसारखं बघत बसायचं भक्ताकडे? असाही प्रश्न प्रकाश महाजन यांनी विचारला आहे. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. विठ्ठलाने भक्त बदलले, तर मग आम्ही आमचा विठ्ठल का बदलू नये? लहान कार्यकर्त्याने पक्ष बदलला की तो निष्ठावान नाही,

### माझा विठ्ठल बदलणार नाही

पुंडलिकाला कुणीतरी विठ्ठल पाहिजे असतो. आपला भक्त पुंडलिक असावा याची विठ्ठलाने काळजी घेतली पाहिजे आणि विठ्ठलाने तसं वागलंही पाहिजे ती पुंडलिकांची एकट्याची जबाबदारी नाही." असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं आहे.मला राजकारणात काम करायचं आहे, हिंदुत्वासाठी काम करत होतो. तीन महिने मी वाट पाहिली. कुणीतरी समजावून सांगेल असं वाटलं होतं.

तो गद्दार, मोठ्यांनी केलं तर काय? असा प्रश्न प्रकाश महाजन यांनी विचारला. हिंदुत्वाच्या भूमिकेपासून दोन भाऊ लांब गेले. दोन भावांच्या मधे चंदू मामा उशिरा आले आधी रशीद मामू आले. आता बलात्कारी चंगेज खान आला आहे तिथे, हे राज ठाकरेंना मान्य आहे का? असाही प्रश्न प्रकाश महाजन यांनी विचारला. एकत्र येऊन शेवटी अस्वस्थता आहेच. निष्ठावान बाळा नांदगावकर आहेत कुठे? ते उपस्थित का नव्हते. शिवडीत एक जागा दिली, वरळीत एक जागा दिली. जी जागा हवी होती ती दिली नाही हे काय आम्हाला माहीत नाही का? हिंदू म्हणून या सगळ्यात तुम्ही कुठे आहात? असा प्रश्न प्रकाश महाजन यांनी म्हटलं आहे.माझा विठ्ठल बदलणार नाही असं प्रकाश महाजन म्हणाले होते. पण त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोडचिठ्ठी दिली. तसंच ते आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत आले आहेत. मी पुंडलिक झालो होतो पण विठ्ठलाने वीट फेकून मारली असं म्हणत त्यांनी राज ठाकरेंवर टीका केली आहे. छोट्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेवरच चर्चा असते. मोठ्या लोकांनी निष्ठा बदलली की समाज, विचार, समाजाची काळजी, देशाची काळजी असं ठरवलं जातं. गरीबाने खाल्लं तर शेण मोठ्यांनी खाल्लं तर श्रावणी. मी पुंडलिक झालो होतो. पण विठ्ठलाने मला वीट फेकून मारली तर मी काय करणार?

# नितीन गडकरींचे 'ते' ट्विट अचानक गायब

## गडकरींचे कुंभमेळ्याशी संबंधित पोस्टनंतर चर्चांना उधाण !

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, नाशिकमधील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी द्वारका चौक सुधारण्याच्या योजनेला केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिल्याची माहिती समाजमाध्यमातून समोर आली होती. परंतु, खुद्द मंत्री गडकरी यांच्या 'एक्स' खात्यावरून ही माहिती अर्थात 'ट्विट' काही वेळातच गायब झाल्यामुळे अनेक जण बुचकळ्यात पडले.**

मंत्री गडकरी यांनी असे का केले असावे, याची राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.शहरातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर उड्डाण पुलाखालील द्वारका चौक हा शहरातील अत्यंत वर्दळीचा महत्त्वाचा चौक आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग, अंतर्गत रस्ते, बसस्थानक, रेल्वे स्थानक तसेच औद्योगिक व व्यापारी भाग यांना जोडणारा प्रमुख केंद्रबिंदू आहे. या ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. कुंभमेळा काळात देश-विदेशातून येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता घेऊन द्वारका चौक सुधारणा प्रकल्पाचे नियोजन झाले आहे. त्या अंतर्गत आधुनिक पद्धतीने चौकाचे



पुनर्रचना, उड्डाण पूल / 'ग्रेड सेपरेटर', सेवा रस्ते, सिग्नल यंत्रणा, पादचारी सुविधा तसेच सार्वजनिक वाहतुकीसाठी आवश्यक सोयी-सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक अधिक सुरळीत होईल, माल वाहतूक, सार्वजनिक वाहतूक आणि आपत्कालीन सेवांची कार्यक्षमता लक्षणियरीत्या वाढेल, तसेच प्रवाशांचा वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे.केंद्रीयमंत्री नितीन गडकरी

### अनेक जण बुचकळ्यात पडले

गडकरी यांच्या अधिकृत 'एक्स' हँडलवरही ते दिसत नव्हते. यामुळे संभ्रमात भर पडली.आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, नाशिकमधील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी द्वारका चौक सुधारण्याच्या योजनेला केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी मंजुरी दिल्याची माहिती समाजमाध्यमातून समोर आली होती.

यांनी दोन दिवसांपूर्वी म्हणजे शनिवारी दुपारी 'एक्स' वर या संदर्भात माहिती दिली होती. "महाराष्ट्रातील नाशिक शहरात २०२७ मध्ये होत असलेल्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आणि शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याच्या उद्देशाने द्वारका चौकाच्या सुधारणेसाठी २१४ कोटी रुपयांच्या तरतुदीसह प्रकल्पाला मंजूरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नाशिक शहरातील वाहतूक सुरळीत होईल आणि माल वाहतूक व सार्वजनिक वाहतुकीची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होईल." असे त्यांनी त्यांनी म्हटले होते. भाविकांसह नाशिककरांनाही दीर्घकालीन उपाययोजना होणार असल्याची भावना निर्माण झाली.

**आयएनएसव्ही कौंडिण्य’ नौदलात** नौकेद्वारे प्राचीन वारशाचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न

# ‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ मस्कतला रवाना

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**प्राचीन जहाजबांधणी शास्त्रानुसार तयार करण्यात आलेली ‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ या नौकेने पहिल्यावहिल्या लांब अंतराच्या प्रवासास सोमवारी सुरुवात केली. ही नौका गुजरातमधील पोरबंदर येथून मस्कत येथे जाण्यास सोमवारी निघाली. कारवार तळावर २१ मे रोजी ‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ नौदलात दाखल झाली.**

## काथ्या, नारळाच्या शेंड्यांचा वापर



## ब्लू-प्रिंट अवशेष उपलब्ध

नौकेची बांधणी करण्यात आली. एकही स्क्रू आणि नौकेचा पोलादी पाया याला घेण्यात आलेला नाही. इतिहास, प्राचीन काळातील कारागिरी आणि आधुनिक काळातील नौदलाची तज्ज्ञता यांचा संगम असल्याचे संरक्षण मंत्रालयाने सांगितले. नौदलातील अधिकाऱ्याने सांगितले, की नौकाबांधणीची कुठलीही ब्लू-प्रिंट किंवा अवशेष उपलब्ध नव्हते.

‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ ही नौका म्हणजे भारताच्या प्राचीन सागरी वारशाचे प्रतीक आहे. हा वारसा जपणे, त्याचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न या नौकेच्या बांधणीद्वारे करण्यात आला. नौदलाच्या पश्चिम कमांडचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांच्या हस्ते नौका औपचारिकपणे दौऱ्यावर रवाना झाली. ओमानचे राजदूत इस्सा सालेह अल शिबानी या वेळी उपस्थित होते.प्राचीन नौकांच्या चित्रणावरून या नौकेची पूर्ण रचना करण्यात आली आहे. दोरीने फळ्या शिवण्याच्या (स्टिच-प्लँक) पारंपरिक तंत्राद्वारे नौकेची बांधणी करण्यात आली. एकही स्क्रू आणि नौकेचा पोलादी पाया याला घेण्यात आलेला नाही. इतिहास, प्राचीन काळातील कारागिरी आणि आधुनिक काळातील नौदलाची तज्ज्ञता यांचा संगम असल्याचे संरक्षण मंत्रालयाने सांगितले. नौदलातील अधिकाऱ्याने सांगितले, की नौकाबांधणीची कुठलीही ब्लू-प्रिंट किंवा अवशेष उपलब्ध नव्हते. द्विमितिय चित्राचा आधार घेऊन त्रिमितिय स्वरुपाची रचना केली गेली. विविध आंतरशाखीय तज्ज्ञ यासाठी लागले. त्यात पुरातत्त्वशास्त्रज्ञ, नौदल रचनाकार, पाण्यातील नौकेच्या प्रवासाची शास्त्रोक्त चाचणी करणारे तज्ज्ञ आणि कारागिरांचा त्यात समावेश होता.नौकेची लांबी ६५ फूट लांब असून, त्यावर १८ जण प्रवास करू शकतात. ही नौका पंधरा दिवस १४०० किलोमीटरचा प्रवास करून ओमानला पोहोचेल. भारताचा पश्चिम किनारा आणि ओमान यांना जोडणारा प्राचीन सागरी मार्गाचा मागोवा घेईल. या मार्गामुळे हिंदी महासागर क्षेत्रात व्यापार, सांस्कृतिक आदानप्रदानाला चालना मिळाली होती. भारत आणि ओमानमधील संबंध याद्वारे आणखी दृढ होतील.ही नौका अजिंठा येथील प्राचीन लेणीमधील भित्तीचित्रावर आधारित आहे. अशा प्रकारची नौका पाचव्या शतकामध्ये वापरात होती. प्राचीन काळात उत्कृष्ट नौकानयनपटू कौंडिण्य यांनी आग्नेय आशियात मोठा प्रवास केला होता. सागरी शक्ती असलेला देश म्हणून भारताचा लौकिक होता. पाचव्या शतकातील या नौकेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी तांत्रिक पातळीवर मोठे आव्हान होते. अशा प्रकारची नौकाबांधणीचे कौशल्य असणाऱ्या केरळमधील कारागिरांना त्यासाठी खास पाचारण करण्यात आले होते. बाबू शंकरन यांच्या नेतृत्वाखाली नौकेची बांधणी झाली. काथ्या, नारळाच्या शेंड्या आणि जलरोधकासाठी नैसर्गिक राळ यांचा वापर करून लाकडाच्या फळ्यांची बांधणी करण्यात आली.‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ पोरबंदरवरून मस्कट येथे जाण्यास निघाल्याचे पाहून खूप आनंद झाला. भारताची समृद्ध सागरी परंपरा नौका दाखवते. या नौकेची बांधणी करणाऱ्या रचनाकारांचे, कारागिरांचे आणि भारताच्या नौदलाचे मी अभिनंदन करतो. नौकेवरील क्रू सदस्य प्रवासामध्ये आखाती देश आणि त्यापलीकडील भारताचे प्राचीन दुवे शोधणार आहेत. ‘आयएनएसव्ही कौंडिण्य’ ही नौका म्हणजे भारताच्या प्राचीन सागरी वारशाचे प्रतीक आहे. हा वारसा जपणे, त्याचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न या नौकेच्या बांधणीद्वारे करण्यात आला. नौदलाच्या पश्चिम कमांडचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल कृष्णा ओमानचे राजदूत इस्सा सालेह अल शिबानी या वेळी उपस्थित होते.प्राचीन नौकांच्या चित्रणावरून या नौकेची पूर्ण रचना करण्यात आली आहे.

# जातीय समीकरणांमुळे भाजपामध्ये फुटीची चिन्हे?

## आमदारांच्या बैठकीने वाद; भाजपाने आपल्याच नेत्यांना का दिला इशारा?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तर प्रदेशमधील लखनौमध्ये भाजपातील ब्राह्मण आमदारांची एक बैठक पार पडली. ही बैठक वादाचा विषय ठरत आहे. त्यामुळे २०२७ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर्गत जातीवर आधारित गटबाजी रोखण्यासाठी भाजपा नेतृत्वाकडून आपल्या लोकप्रतिनिधींना जातीच्या आधारावर बैठका न घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

जातीवर आधारित घेतलेल्या या बैठकीमध्ये तब्बल ४० आमदारांची उपस्थिती होती. यावर आता जोरदार टीका केली जात आहे. या बैठकीकडे भाजपातील अंतर्गत फुटीची चिन्ह म्हणूनदेखील पाहिले जात आहे. नेमके हे प्रकरण काय? आमदारांच्या बैठकीने वाद का निर्माण झालाय? भाजपाने आपल्याच नेत्यांना इशारा का दिला? जाणून घेऊयात....भाजपाचे उत्तर प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी यांनी सार्वजनिकरीत्या हा इशारा दिला. लखनौमधील कुशीनगरचे आमदार पी. एन. पाठक यांच्या निवासस्थानी भाजपाच्या अनेक ब्राह्मण आमदार आणि विधान परिषद सदस्यांची बैठक झाली होती.



राज्यातील ब्राह्मण समाजावर अन्याय होत असल्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. चौधरी यांनी एका कठोर निवेदनात म्हटले आहे की,“ही बैठक पक्षाची घटना आणि मूल्यांच्या विरोधात होती.” तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती झाल्यास ती शिस्तभंग मानली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

भाजपाच्या एका नेत्याने सांगितले की, केवळ ब्राह्मण समाजाच्या बैठकीमुळेच

## भाजपा नेत्यांना इशारा

माहिती गोळा करण्यात आली होती,” अशी माहिती भाजपामधील एका सूत्राने दिली.सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपाचे केंद्रीय नेतृत्व या बैठकीवर नाराज असून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कार्यालयानेही याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी संबंधित आमदारांशी संपर्क साधून त्यांची कानउघाडणी केली आणि त्यांना तंबीही दिली.

नेतृत्वाला ही भूमिका घ्यावी लागली असे नाही. “मंगळवारी रात्री झालेल्या ब्राह्मण आमदारांच्या डिनर बैठकीपूर्वी, त्याच दिवशी दुपारी लखनौमधील एका हॉटेलमध्ये पश्चिम उत्तर प्रदेशमधील भाजपा आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली होती. या बैठकीला उपस्थित असलेले नेते पश्चिम उत्तर प्रदेशमधील एका ज्येष्ठ जाट नेत्याचे विरोधक मानले जातात. त्या बैठकीचे फोटो बाहेर न आल्यामुळे ती फारशी चर्चेत आली नाहीआहे. “या बैठकीत सहभागी झालेल्या आमदार आणि विधान परिषद सदस्यांची नावे आणि संपर्क तपशील असलेली दोन पाने सोशल मीडियावर व्हायरल झाली.

# अहिल्यादेवी व लक्ष्मीने खेळली फुगडी



मालिकेतील कलाकार विविध निमित्ताने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसतात. सोशल मीडियावर त्यांचे अनेक व्हिडीओ पाहायला मिळतात. अनेकदा ट्रेंडिंग गाण्यावर कलाकार डान्स करताना दिसतात. आता मात्र दोन लोकप्रिय अभिनेत्रीने महाराष्ट्राचा पारंपारिक फुगडी खेळल्याचा व्हिडीओ सध्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. लक्ष्मी निवास(LAKSHAMI NIWAS) व पारू(PAARU) या मालिकांचा महासंगम आहे. या दोन्ही मालिका एकत्र दिसणार आहेत. या निमित्ताने दोन्ही मालिकेतील कलाकार एकत्र आले आहेत. लक्ष्मी निवास व पारू मधील दोन अभिनेत्रींचा हा व्हिडीओला प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसत आहे.झी मराठी वाहिनीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ढोल-ताशाचा आवाज ऐकायला मिळत आहे. या तालाच्या गजरात अहिल्यादेवी व लक्ष्मी यांनी फुगडी खेळल्याचे पाहायला मिळत आहे. त्यानंतर त्यांनी त्यावर ठेकाही धरला आहे. झी मराठीने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये अभिनेत्री मुग्धा कर्णिक यांना टॅग केले आहे. पारू मालिकेत मुग्धा कर्णिक यांनी अहिल्यादेवी किर्लोस्कर ही भूमिका साकारली आहे. लक्ष्मी निवास मध्ये लक्ष्मी ही भूमिका अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांनी साकारली आहे. पारू मालिकेची लोकप्रियता मोठी असल्याचे वेळोवेळी पाहायला मिळते. तर काही दिवसांपूर्वीच प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या लक्ष्मी निवास या मालिकेनेही प्रेक्षकांच्या मनात जागा निर्माण केली आहे.नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोत जयंत व अहिल्यादेवी समोरासमोर आल्याचे पाहायला मिळाले होते. पॅलेसवरून त्यांच्यात वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले होते. लक्ष्मी निवास' या मालिकेत काही दिवसांपूर्वीच जान्हवी व जयंतचे लग्न ठरले आहे. त्यांच्या लग्नामुळे जान्हवीच्या घरातील सर्व जण आनंदात असल्याचे दिसत आहे. श्रीकांत व लक्ष्मी यांना जयंत हा जान्हवीसाठी योग्य वाटत असल्यामुळे तेदेखील आनंदात आहेत. दुसरीकडे पारू या मालिकेत अहिल्यादेवीने अनुष्का व आदित्यचे लग्न ठरवले आहे.

## कंगनाने सांगितला 'तो' किस्सा

बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री कंगना रणौत कधी वादग्रस्त विधानांमुळे तर कधी वैयक्तिक आयुष्यातील घटनांमुळे सोशल मीडियावर कायमच चर्चेत असतात. सध्या त्या चर्चेत येण्याचं कारण देखील तितकंच खास आहे. नुकतीच कंगना यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नेहमीप्रमाणे बॉलीवूडवर टीका केली. तसंच आपल्या आजवरच्या चित्रपटाविषयी काही किस्से सांगितले. यावेळी कंगना यांनी 'मर्डर' चित्रपटासंबंधित एक किस्सा सांगितला.अभिनेत्री कंगना रणौत यांचा 'इमर्जन्सी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाचं प्रमोशन करताना त्या दिसत आहेत. या चित्रपटानिमित्ताने कंगना यांनी राज शमानी यांच्या पॉडकास्टवर हजेरी लावली होती. यावेळी कंगना यांनी अनेक धमाल किस्से सांगितले. 'गँगस्टर' सिनेमातून कंगना यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या सिनेमाच्या निर्मिती व दिग्दर्शनाची जबाबदारी अनुराग बासुने सांभाळली होती. या चित्रपटात कंगना इम्रान हाशमीबरोबर प्रमुख भूमिकेत झळकल्या होत्या. याच चित्रपटाबाबत सांगताना कंगना यांनी 'मर्डर' विषयी किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, "माझ्या घरच्यांना या इंडस्ट्रीबाबत फार माहित नव्हतं. जेव्हा मला अनुरागने 'मर्डर' सिनेमासाठी विचारणा केली. तेव्हा मी माझ्या वडिलांना सांगितलं की, 'गँगस्टर' ज्याने दिग्दर्शित केला आहे, तोच अनुराग 'मर्डर' सिनेमा करतोय आणि त्याने मला या सिनेमासाठी विचारलं आहे. हे ऐकताच माझे वडील खूप संतापले आणि थेट घरी यायला सांगितलं.



## रश्मिका मंदानाने तिच्या पायाच्या दुखापतीबद्दल दिली अपडेट

नॅशनल क्रश अशी बिरूद जिच्या नावामागे लागतात अशी अभिनेत्री रश्मिका मंदानाचे (RASHMIKA MANDANNA) 'ॲनिमल' आणि 'पुष्पा २: द रुल' या ब्लॉकबस्टर सिनेमांमुळे आजही कौतुक होते. या अभिनेत्रीचा लवकरच 'छावा' (CHHAVA) हा सिनेमा येणार आहे. मात्र, अलीकडेच जिम करताना तिच्या पायाला दुखापत झाली. २२ जानेवारी २०२५ रोजी तिच्या आगामी ऐतिहासिक नाट्यपट 'छावा'च्या ट्रेलर लॉंचला ती सहभागी झाली होती. सुरुवातीला व्हीलचेअरवर आलेल्या रश्मिकाने नंतर मदतीने स्टेजवर लंगडत जात चित्रपटाचे प्रमोशन केले. रश्मिकाने नुकतीच इन्टाग्रामवर तिच्या दुखापतीविषयी अपडेट दिली आहे. तिने एक पोस्ट शेअर करत त्यात तिच्या दुखापतीविषयी माहिती दिली आहे. पोस्टच्या सुरुवातीला तिने महाराणी येसूबाईंची भूमिका साकारायची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, पुढे तिने पोस्टमध्ये तिच्या दुखापतीबद्दल अधिक माहिती दिली.रश्मिकाने या पोस्टमध्ये तिच्या पायाला असलेल्या प्लास्टरचा लहान व्हिडीओ शेअर केला आहे. त्यावर तिच्या मैत्रिणींनी नक्षी काढल्या आहेत. तिने या फोटोसाठी कॅप्शन देत लिहिले, "हे सर्व क्यूट वाटत असले, तरी पायाला आतमध्ये तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाले आहे आणि स्नायू फाटले आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून मी जमिनीवर पाय टेकवलेला नाही. मी स्वतःच्या पायांवर उभं राहणं खरंच मिस करतेय. कृपया स्वतःची काळजी घ्या. लोक जेव्हा काळजी घेण्याचा सल्ला देतात, तेव्हा ते हलक्यात घेऊ नका! तुम्हाला खूप प्रेम !"लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' चित्रपटात रश्मिका मंदान्ना महाराणी येसूबाई यांची म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नीची भूमिका साकारत आहे. चित्रपटात मुख्य भूमिकेत विकी कौशल असून, मराठा साम्राज्याच्या संघर्षांच्या पार्श्वभूमीवर आधारित कथा सादर केली गेली आहे. ट्रेलरला प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

## फातिमाने सांगितला कास्टिंगचा अनुभव

दंगल गर्ल अशी ओळख असलेल्या फातिमा सना शेख या अभिनेत्रीने खरंत आत्तापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. चाची ४२० हा बाल कलाकार म्हणून तिचा पहिला सिनेमा. त्यानंतर तिने दंगल या सिनेमात गीता फोगटची भूमिका निभावली. दंगल सिनेमानंतर कास्टिंग काऊचचा अनुभव कसा आला होता? हे फातिमाने आता एका मुलाखतीत सांगितलं आहे. फातिमा सना शेखने दंगलमध्ये केलेल्या भूमिकेचं कौतुक झालं होतं. त्यानंतर मात्र ती मोठ्या भूमिकेत दिसलेली नाही. आमिर खानच्या ठग्ज ऑफ हिंदुस्थान या चित्रपटातही फातिमा सना शेख होती. मात्र हीदेखील फार मोठी भूमिका नव्हती. अशात आता फातिमाने तिला आलेला कास्टिंग काऊचचा अनुभव सांगितला आहे.फातिमाने दंगल सिनेमानंतर ल्युडो, अजीब दास्ताँ, धक धक अशा चित्रपटांमध्ये काम केलं. मात्र दंगल नंतर तिला भूमिका मिळवण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागले.

# ट्विंकल खन्नाचा संताप

अभिनेता अक्षय कुमार(AKSHAY KUMAR) हा सध्या त्याच्या स्काय फोर्स चित्रपटामुळे चर्चेत आहे. २४ जानेवारी २०२५ ला हा चित्रपट रिलीज झाला आहे. बऱ्याच काळानंतर अभिनेत्याच्या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. अभिनेता त्याच्या चित्रपटांबरोबरच त्याच्या खासगी आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. सोशल मीडियावर पत्नी ट्विंकल खन्ना(TWINKLE KHANNA)बरोबर फोटो शेअर करताना दिसतो. ट्विंकल खन्नादेखील तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असलेली दिसते. आता ट्विंकल खन्नाने पती व अभिनेता अक्षय कुमार बाबत केलेले वक्तव्य चर्चेत आहे. अक्षय कुमारने गेल्या वर्षी एका मुलाखतीत तो उजव्या विचारसरणीचा आणि ट्विंकल डाव्या विचारसरणीचा विचार करते, असे म्हटले होते.

३० धावांनी विजय मिळवला

## 7 विकेट्स घेऊन हिमाचलची उडवली दाणादाण

# CSK च्या गोलंदाजाने फोडली डरकाळी!

## ३० धावा देऊन ७ विकेट्स घेतल्या

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीसीसीआयने आयोजित केलेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये सोमवारी महाराष्ट्राचा रामकृष्ण घोषे कहर केला. त्याने अद्याप आयपीएल सामना खेळलेला नसला तरी, त्याने आता २०२५-२६ च्या विजय हजारे ट्रॉफीच्या ग्रुप सी सामन्यात सवाई मानसिंग स्टेडियमवर, हिमाचल प्रदेशविरुद्ध ९.४ षटके गोलंदाजी करत ३० धावा देऊन ७ विकेट्स घेऊन खळबळ उडवून दिली आहे. त्याच्या गोलंदाजीच्या कामगिरीमुळे एकेकाळी मोठ्या धावसंख्येसाठी सज्ज असलेल्या हिमाचल प्रदेशचा ४९.४ षटकांत २७१ धावांच करू शकला, तथापी हिमाचल प्रदेशने महाराष्ट्राविरुद्ध ७ धावांनी विजय मिळवला.**



हिमाचल प्रदेशने आह सामना ७ धावांनी जिंकला. २७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना महाराष्ट्र फक्त ९ बाद २६४ धावाच करू शकला. हिमाचल प्रदेशकडून पुखराज मानने शतक झळकावले. त्याने १११ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांसह ११० धावांची शानदार खेळी केली. वैभव अरोराने देखील ३३ चेंडूत ४० धावांची महत्वाची खेळी केली. महाराष्ट्राकडून रामकृष्ण घोषे प्रतिस्पर्ध्याकडून सर्वाधिक ७ बळी टिपले. प्रदीप, राजवर्धन हंगेरगेकर आणि सत्यजित यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. धावांचा पाठलाग करणाऱ्या महाराष्ट्राचा डाव शेवटच्या चेंडूवर २६४ धावांवर गारद झाला. महाराष्ट्राकडून संघाकडून अंकित बावणेने १२० चेंडूत ९७ धावांची खेळी केली. तर निखिल नाईकने ३९ धावा फटकावल्या. परंतु त्यांना संघाला विजय मिळवून देता आला नाही. प्रतिस्पर्ध्याकडून कर्णधार मृदुल सुरोच, रोहित कुमार आणि आर्यमन सिंग यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. तर वैभव अरोराने १ बळी घेतला.२८ ऑगस्ट १९९७ रोजी नाशिक येथे जन्माला आलेल्या रामकृष्ण घोषला आयपीएल २०२५ च्या आधी चेन्नई सुपर किंग्जने करारबद्ध करण्यात आले होते. त्यावेळी सीएसकेकडून लिलावात खेळाडूवर ३० लाख रुपये खर्च करण्यात आले होते. सीएसकेने रामकृष्ण घोषला आयपीएल २०२६ साठी कायम ठेवले आहे. परंतु रामकृष्ण घोषने अद्याप आयपीएल लीगमध्ये एकही सामना खेळलेला नाही.रामकृष्ण घोषने आतापर्यंत ११ प्रथम श्रेणी सामने खेळले असूनत्याने ३५.०० च्या सरासरीने २१ विकेट्स चटकावल्या आहेत. तर त्यांनी ७ लिस्ट-ए सामन्यांमध्ये

### हिमाचल प्रदेश विजयी

संघाला विजय मिळवून देता आला नाही. प्रतिस्पर्ध्याकडून कर्णधार मृदुल सुरोच, रोहित कुमार आणि आर्यमन सिंग यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. तर वैभव अरोराने १ बळी घेतला.२८ ऑगस्ट १९९७ रोजी नाशिक येथे जन्माला आलेल्या रामकृष्ण घोषला आयपीएल २०२५ च्या आधी चेन्नई सुपर किंग्जने करारबद्ध करण्यात आले होते. त्यावेळी सीएसकेकडून लिलावात खेळाडूवर ३० लाख रुपये खर्च करण्यात आले होते. सीएसकेने रामकृष्ण घोषला आयपीएल २०२६ साठी कायम ठेवले आहे.

१७ विकेट्स घेण्याची किमया साधली नाही. त्यांनी ९ टी-२० सामन्यांमध्ये २ विकेट्स देखील घेतल्या आहेत. घोषे प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ३६.९१ च्या सरासरीने ४४३ धावा देखील काढल्या आहेत. बीसीसीआयने आयोजित केलेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये सोमवारी महाराष्ट्राचा रामकृष्ण घोषने कहर केला. त्याने अद्याप आयपीएल सामना खेळलेला नसला तरी, त्याने आता २०२५-२६ च्या विजय हजारे ट्रॉफीच्या ग्रुप सी सामन्यात सवाई मानसिंग स्टेडियमवर, हिमाचल प्रदेशविरुद्ध ९.४ षटके गोलंदाजी करत ३० धावा देऊन ७ विकेट्स घेऊन खळबळ उडवून दिली आहे. त्याच्या गोलंदाजीच्या कामगिरीमुळे एकेकाळी मोठ्या धावसंख्येसाठी सज्ज असलेल्या हिमाचल प्रदेशचा ४९.४ षटकांत २७१ धावांच करू शकला, तथापी हिमाचल प्रदेशने महाराष्ट्राविरुद्ध ७ धावांनी विजय मिळवला. हिमाचल प्रदेशने आह सामना ७ धावांनी जिंकला. २७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना महाराष्ट्र फक्त ९ बाद २६४ धावाच करू शकला. हिमाचल प्रदेशकडून पुखराज मानने शतक झळकावले. त्याने १११ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांसह ११० धावांची शानदार खेळी केली. वैभव अरोराने देखील ३३ चेंडूत ४० धावांची महत्वाची खेळी केली. बळी घेतला. धावांचा पाठलाग करणाऱ्या महाराष्ट्राचा डाव शेवटच्या चेंडूवर २६४ धावांवर गारद झाला. महाराष्ट्राकडून संघाकडून अंकित बावणेने १२० चेंडूत ९७ धावांची खेळी केली.

## PCB अध्यक्ष मोहसीन नक्वींनी लाज सोडली!

## आशिया कप ट्रॉफी पाहिजे असेल तर घातली नवी अट

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कप ट्रॉफीबाबतचा वाद अद्यापही निवळलेला नाही. भारताला आशिया कप जेतेपदाची ट्रॉफी मिळालेली नाही. दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे अध्यक्ष मोहसीन नक्वी हे अलिकडच्या आशिया कप विजेत्याच्या ट्रॉफीबाबत अत्यंत हट्टी झाले असल्याचेही दिसून येत आहेत.**



त्यांनी पुन्हा सांगितले की जर भारताला टी-२० आशिया कप २००५ ट्रॉफी हवी असेल तर ती त्यांच्याकडून दुबईमध्ये स्वीकारायला हवी. मोहसीन नक्वी यांनी सांगितले की, "ट्रॉफी हस्तांतरणाची स्थिती कायम आहे. जर भारताला ट्रॉफी पाहिजे असेल तर त्यांनी त्यांचा कर्णधार दुबईला पाठवावा आणि माझ्याकडून ती स्वीकारावी."दुबईमध्ये २८ सप्टेंबर रोजी खेळवण्यात आलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कप फायनलमध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध ५ विकेट्सने विजय मिळवला. विजेतेपद जिंकल्यानंतर,

### हस्तांदोलन करण्यात रस नाही

याबाबत बोलताना नक्वी म्हणाले की, "ज्युनियर आशिया कप फायनल दरम्यान भारतीय ज्युनियर खेळाडूंच्या वर्तनाबद्दल आम्ही आयसीसीला पत्र लिहिणार आहोत, जे वर्तन अस्वीकार्य होते."आशिया कप टॉस दरम्यान भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानी कर्णधार सलमान आगासोबत हस्तांदोलन करणे टाळले होते.

भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने सादरीकरण समारंभात मोहसीन नक्वीकडून ट्रॉफी न स्वीकारताच भारतात परतला होता. तेव्हापासून, जेतेपदाची ट्रॉफी दुबईतील आशियाई क्रिकेट परिषद कार्यालयात आहे. नक्वी यांच्याकडून दावा करण्यात आला आहे की, आशियाई क्रिकेट परिषदचे अध्यक्ष म्हणून, ट्रॉफी सादर करण्याचा अधिकार त्यांचाच आहे.ज्युनियर आशिया कप स्पर्धे दरम्यान भारतीय अंडर-१९ खेळाडूंच्या वाईट वर्तनाबद्दल पाकिस्तान आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे तक्रार करणार असल्याचे देखील नक्वी यांनी सांगितले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 30 डिसेंबर 2025

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकी करिता

# शहरातील सर्व मतदारांनी मतदान करावे’!

### सुप्रसिद्ध कलाकार अथर्व सुदामे यांचे आवाहन...

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी शपथ चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नाट्य रसिकांनी घेत येत्या १५ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत मतदान करण्याचा निर्धार केला.**



पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ‘अथर्व सुदामे लाईव्ह...’ या नाट्यप्रयोगाच्या वेळी मतदान जनजागृती उपक्रम जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य असल्याचा संदेश देत नाट्य रसिकांनी उत्स्फूर्तपणे मतदानाची शपथ यावेळी घेतली.

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या नाट्यप्रेमींनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी महापालिका निवडणुकीत नक्की मतदान करण्याचा निर्धार केला.

## उमेदवारांनी सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक

### जनता संपर्क विभागात प्रसार माध्यम व सनियंत्रण समिती कार्यालयाची स्थापना

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी प्रसारित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती, सोशल मीडिया प्रचार, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कार्यालयाकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे, अशी माहिती समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी दिली आहे.**



उमेदवार व राजकीय पक्षांकडून निवडणूक काळात पेड न्यूज, द्वेषपूर्ण मजकूर, आचारसंहितेचा भंग करणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या जाऊ नये, यासाठी प्रसार माध्यम व सनियंत्रण समिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून सर्व माध्यमांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे. तसेच कोणतीही जाहिरात समितीच्या पूर्वप्रमाणनाशिवाय प्रसारित करू नये. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

समितीचे मध्यवर्ती कार्यालय पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील माहिती व जनसंपर्क विभागात कार्यान्वित झाले आहे. प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी जाहिरात प्रसारित करण्याच्या विहीत वेळेत समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची माहिती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच क्यूआर कोडद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित क्यूआर कोड सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये बॅनर स्वरूपात लावण्यात आलेले आहेत.

समितीकडे पूर्वप्रमाणन करीता आलेल्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडे राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जाहिरातीत सुचवलेले बदल, दुरुस्त्या किंवा वगळणे उमेदवार किंवा संबंधित राजकीय पक्षावर बंधनकारक राहतील. पूर्वप्रमाणन मंजूर झाल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रभाग 10 मधून

# अनुराधाताई गोरखे यांचा उमेदवारी अर्ज दाखल!

### आमदार अमित गोरखे यांच्या उपस्थितीत अर्ज सादर; विकास व नागरिकसेवेची दिली ठाम ग्वाही




**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रभागनिहाय राजकीय हालचालींना वेग आला आहे. कोणत्या प्रभागातून कोण उमेदवार असेल, याबाबत उत्सुकता आणि धाकधूक वाढलेल्या असतानाच प्रभाग क्रमांक १० मधून भारतीय जनता पक्षाच्या माजी नगरसेविका अनुराधाताई गोरखे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या प्रभागातील निवडणूक लढतीला अधिक रंग चढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.**

भाजप आमदार अमित गोरखे यांच्या प्रमुख उपस्थितीत अनुराधाताई गोरखे यांनी आज अधिकृतपणे उमेदवारी अर्ज सादर केला. या अर्ज दाखल होताच प्रभाग क्रमांक १० मधील निवडणूक प्रचाराला औपचारिक सुरुवात झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांची मोठी उपस्थिती यावेळी दिसून आली.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना अनुराधाताई गोरखे म्हणाल्या, “प्रभाग क्रमांक १० चा सर्वांगीण आणि संतुलित विकास हेच माझे प्रमुख उद्दिष्ट आहे. नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा, पायाभूत विकासकामे, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, सुरक्षा तसेच नागरी सोयी-सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.” त्यांनी विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

“मी केवळ नगरसेवक म्हणून नव्हे, तर नागरिकांचा सेवक म्हणून काम करणार आहे. प्रभागातील प्रत्येक नागरिकाचे प्रश्न, अडचणी आणि अपेक्षा समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू. सामाजिक जबाबदारी जपत नागरिकांच्या सेवेसाठी २४ तास, सातही दिवस उपलब्ध राहण्याची माझी भूमिका आहे,” अशी ठाम ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

अनुराधाताई गोरखे यांची शहरात एक आदर्श शिक्षिका म्हणूनही सन्मानाची ओळख आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानासोबतच सामाजिक कार्यातील सक्रिय सहभागामुळे त्या नागरिकांमध्ये लोकप्रिय आहेत. गेल्या महापालिका निवडणुकीत शहरात सर्वाधिक मताधिक्याने विजयी ठरलेल्या उमेदवारांपैकी एक अशी त्यांची विशेष ओळख असून, त्याच विश्वासाच्या बळावर त्या पुन्हा एकदा जनतेसमोर जात आहेत.

आमदार अमित गोरखे यांनीही यावेळी बोलताना अनुराधाताई गोरखे यांच्या कार्याचा आढावा घेतला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १० मध्ये विकासाची घडी पुन्हा वेगाने बसवली जाईल, असा विश्वास व्यक्त केला. भाजपच्या कार्यकर्त्यांनीही उत्साहात प्रचारासाठी सज्ज असल्याचे संकेत दिले.

एकूणच, अनुराधाताई गोरखे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने प्रभाग क्रमांक १० मधील निवडणूक वातावरण तापले असून, आगामी काळात येथे चुरशीची लढत पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

---

# महापालिका शाळेत आधुनिक सोयी-सुविधांची जोड अन् आदर्श शाळा पुरस्कार!

### मिशन- PCMC : पिंपळे निलख प्रभागात तुषार कामठे यांच्या कामाचा ठसा



**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 26, पिंपळे निलख-विशालनगर येथील महापालिका शाळा आता आधुनिक शिक्षणाचे केंद्र बनली आहे. शाळेच्या नव्या रूपांतरामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळते, तसेच शाळा संपूर्ण परिसरात प्रेरणास्थान ठरली आहे.**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी 2017 मध्ये निवडून येताच शाळेच्या सुधारणा आणि नूतनीकरणावर विशेष लक्ष दिले. त्यांच्या पुढाकारामुळे शाळेत ई-लर्निंग सुविधा, संगणक लॅब, सुरक्षित खेळाचे मैदान, आधुनिक वर्ग, तसेच सेमी इंग्लिश मिडीयम सुरु करण्यात आले. यामुळे विद्यार्थीसंख्या हजारावर पोहोचली असून, शिक्षणाच्या कक्षा मोठ्या प्रमाणात रुंदवल्या गेल्या आहेत.

महानगरपालिका शाळांबाबत असलेला “चांगल्या सुविधा नसतात” हा समज पिंपळे निलख शाळेने पुसून टाकला आहे. शाळेला यशस्वी सुधारणा आणि आधुनिक सुविधांमुळे आदर्श शाळा म्हणून प्रथम पारितोषिकही मिळाले आहे. शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी शाळेच्या या बदलाबाबत सांगितले की, “शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसावे. प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळावे, त्याच्या कुवतीनुसार संधी उपलब्ध व्हाव्यात, आणि शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून प्रेरणेचे ठिकाण बने, हेच माझे ध्येय आहे. पिंपळे निलख शाळेचे हे रूपांतर त्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.” तुषार कामठे यांच्या नेतृत्वाखाली पिंपळे निलख शाळेचे हे रूपांतर संपूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये प्रेरणास्थान ठरले आहे. आधुनिक सुविधांमुळे शाळा ही शिक्षणाचे आदर्श केंद्र म्हणून ओळखली जात आहे.


## प्रभाग 9 मध्ये परिवर्तनाचा शंखनाद

# जनसागराच्या साक्षीनं उमेदवारी अर्ज दाखल!

### नागरिकांचा उत्साह, मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, प्रभागात परिवर्तनाचे वारे वाहत असल्याचे चित्र







**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**नव्या जिद्दीने आणि ध्येयाने प्रेरीत होऊन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रभाग क्रमांक ९ मधून आज चारही उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज 'क' क्षेत्रीय कार्यालयात दाखल केले. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांचा उत्साह आणि मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, प्रभागात परिवर्तनाचे वारे वाहत असल्याचे स्पष्ट चित्र पाहायला मिळाले.**

शक्तीप्रदर्शन आणि उत्साह सकाळी प्रभागातील प्रमुख चौकांमधून कार्यकर्त्यांच्या आणि नागरिकांच्या उपस्थितीत मिरवणूक काढण्यात आली. "जनसेवेचा ठाम निर्धार" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि कार्यकर्त्यांच्या प्रचंड जल्लोषात उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपले अर्ज सुपूर्द केले. जनसेवेची भक्कम शिदोरी गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागातील घराघरात असलेला जनसंपर्क आणि सामाजिक कार्याची भक्कम शिदोरी हीच या उमेदवारांची जमेची बाजू मानली जात आहे.

अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना उमेदवारांनी आपला मानस स्पष्ट केला. "हा लढा केवळ निवडणूक जिंकण्यासाठी नाही, तर प्रभागातील प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचा, सन्मानाचा आणि सर्वांगीण विकासाचा आहे. नागरिकांनी आजवर दिलेला विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. आता प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आम्ही सज्ज आहोत," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

#### ठळक वैशिष्ट्ये:

प्रचंड जनसमुदाय: नागरिकांच्या उपस्थितीने उमेदवारांचे बळ वाढले. शिस्तबद्ध नियोजन: 'क' क्षेत्रीय कार्यालयात शांततेत आणि सन्मानपूर्वक अर्ज दाखल. विकासाचा निर्धार: जनसंपर्क आणि सामाजिक कार्यावर भर.

विकासाचा नवा रोडमॅप प्रभागातील मूलभूत समस्या सोडवणे, महिला सुरक्षा, तरुणांसाठी रोजगार संधी आणि आधुनिक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे उमेदवारांनी सांगितले. "एकत्र येऊन प्रभागाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवा इतिहास घडवूया," असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या उमेदवारी अर्जांमुळे प्रभाग ९ मधील निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून, आता संपूर्ण शहराचे लक्ष या प्रभागाकडे लागले आहे.

## पिंपरी चिंचवड : प्रभाग क्रमांक 8 मध्ये

# तुषार सहाणे यांच्या प्रचारार्थ ‘जनसागर’ उसळला

### रॅलीतून शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल!; हजारो नागरिकांचा सहभाग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्रमांक ८ इंद्रायणी नगरच्या विकासाचा ध्यास घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार तुषार भिवाजी सहाणे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत दाखल केला. यावेळी सेक्टर १ पासून निघालेल्या भव्य रॅलीत हजारो नागरिकांनी सहभागी होत ‘विकासाचा विचार, आपला तुषार’ अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.**






उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी काढण्यात आलेल्या या रॅलीची सुरुवात सेक्टर १ येथून झाली. त्यानंतर सेक्टर २ येथील गणेश मंदिर, सेक्टर ३ गुरुविहार, सेक्टर ४, ६, ७, मोशी प्राधिकरण, सेक्टर १३, १०, १२ तसेच खांडे वस्ती आणि बालाजी नगर अशा संपूर्ण प्रभागातून ही रॅली मार्गस्थ झाली. ठिकठिकाणी महिलांनी सहाणे यांचे औक्षण केले, तर तरुणांनी बाईक रॅली काढून जोरदार घोषणाबाजी केली.

”प्रभागातील जनतेचा हा उत्स्फूर्त पाठिंबाच माझी खरी ताकद आहे.

गेल्या काही वर्षात केलेल्या कामाची ही पावती असून, आगामी काळात इंद्रायणी नगरला विकासाच्या मॉडेलवर नेण्याचा माझा मानस आहे,” असा विश्वास यावेळी तुषार सहाणे यांनी व्यक्त केला.



# “Morning Walk with Dr. Suhas” Campaign Receives Enthusiastic Response in Ward No. 8

## Mission PCMC : Promoting Healthy Living Through Direct Citizen Engagement

**Pimpri-Chinchwad:** As part of his grassroots outreach, BJP candidate from Ward No. 8 (Indrayani Nagar–Bhosari), renowned orthopaedic surgeon Dr. Suhas Kamble, has launched a unique public engagement initiative titled “Morning Walk with Dr. Suhas,” which is receiving an encouraging response from citizens across the ward.

Through this campaign, Dr. Kamble is interacting directly with residents during their daily morning walks, listening to their concerns, and discussing issues related to health, lifestyle, cleanliness, and civic amenities. The initiative has struck a chord with senior citizens, youth, and working professionals, who appreciate the informal and accessible platform for dialogue.





“Through initiatives like ‘Morning Walk with Dr. Suhas’, my aim is to connect with citizens at the grassroots and understand their everyday concerns. A healthy ward begins with healthy habits, clean surroundings, and responsive governance. I assure the people of Ward No. 8 that I will work with dedication, transparency, and sensitivity to improve their quality of life and create a safer, healthier, and more livable neighborhood for all.” **- Dr. Suhas Kamble,** Candidate BJP.

Speaking during one such interaction, Dr. Kamble emphasized the importance of a healthy lifestyle along with a healthy living environment. “Good health is not limited to hospitals alone. Clean surroundings, safe roads, open spaces, and awareness about fitness are equally important. As a doctor and a public representative, I want to work towards improving the overall quality of life for citizens,” he said.

Residents from areas including Indrayani Nagar, Bhosari, and nearby localities have actively participated in the morning walks, sharing feedback and expectations regarding infrastructure, sanitation, public safety, and healthcare facilities. Many citizens described the initiative as refreshing and people-centric, highlighting Dr. Kamble’s approachable nature.

The “Morning Walk with Dr. Suhas” campaign has also helped strengthen community bonding while reinforcing the message of preventive healthcare and active living. With growing participation each day, the initiative is emerging as a strong connect between the candidate and voters, reflecting Dr. Kamble’s commitment to inclusive, ground-level engagement and citizen-focused development.

# Municipal School Transformed with Modern Amenities and Awarded as an Ideal School!

## Mission PCMC : The Mark of Tushar Kamthe’s Work in Pimpri Nilakh Ward

**Pimpri-Chinchwad:** The municipal school in Ward No. 26, Pimpri Nilakh-Visalnagar, under Pimpri-Chinchwad Municipal Corporation, has now become a center for modern education. Due to the school’s new transformation, students are receiving quality education, and the school has become a source of inspiration throughout the area.



"Education should not be limited to just textbook knowledge. Every child should receive quality education, opportunities should be available according to their abilities, and a school should not only be a center for education but also a place of inspiration. This transformation of Pimpri Nilakh School is a small step toward that goal." **— Tushar Kamthe,** City President, Candidate, Nationalist Congress Party

Since being elected in 2017, Tushar Kamthe, City President of the Sharad Pawar group of the Nationalist Congress Party, has focused on improving and renovating the school. Due to his initiative, the school now offers e-learning facilities, a computer lab, a safe playground, modern classrooms, and even a semi-English medium. As a result, the student strength has crossed a thousand, and the scope of education has expanded significantly.

The perception that municipal schools “lack good facilities” has been erased by Pimpri Nilakh School. Due to successful improvements and modern amenities, the school has also been awarded first prize as an ideal school.